# धुळे जिल्हा परिषद, धुळे विशेष अनुशेष भरती मोहिम

**जाहिरात क्र.१** **दिनांक- सप्टेंबर, २०११**

धुळे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील व त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हयात खालील विभागांत आस्थापनेवरील खालील नमुद केलेले गट-क संवर्गाच्या मागासवर्गीयांच्या अनुशेषाची रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी व भरतीवरील निर्बंध नसलेल्या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**संभाव्य पदे**

| अ.क्र | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा | अ.ज | वि.जा.भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | अपंग | |
| | | | | | | | अ | ब | क | ड | | | | | |
| ०१ | कनिष्ठ अभियंता (ल.सि.वि) | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | ०१ | सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | स्थापत्य शाखेची पदवी किंवा पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ०२ | कनिष्ठ अभियंता (बांधकाम) | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | ०१ | सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | स्थापत्य शाखेची पदवी किंवा पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ०३ | औषध निर्माता | ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | ०२ | सर्वसाधारण | -- | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | संविधान मान्य विद्यापिठाची विज्ञान शाखेचा पदवीधारक, डि.फॉर्मसी/ बी.फॉर्मसी उत्तीर्ण. राज्य शासनाच्या रुग्णालयातील दवाखाना सहाय्यकाच्या पदाचा ५ वर्षाचा अनुभव., औषध शाळा अधिनियम १९४८ खाली नोंदणीकृत औषध निर्माता असणे आवश्यक |
| ०४ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | ०२ | सर्वसाधारण | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन संविधी मान्य विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवीधारक अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारणं करणा-या अथवा कोणत्याही सरकारी अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात ३ वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामांचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना पसंतीक्रम देण्यात येईल. |
| ०५ | आरोग्य सेवक (पुरूष) (हंगामी फवारणी कर्मचा-यांमधून) | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ३६ | अंशकालीन | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | जे विज्ञान विषयासह एस.एस.सी. उत्तीर्ण आहेत तसचे राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून किमान ९० दिवसाचा अनुभव आवश्यक . |
| | | | | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | |
| | | | | खेळाडू | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | |
| | | | | महिला | - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | |
| | | | | सर्वसाधारण | ०६ | ०८ | -- | ०१ | -- | ०२ | ०२ | ०५ | ०३ | ०१ | |
| ०६ | आरोग्य सेवक (स्त्री) | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | २१ | अंशकालीन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | एस.एस.सी.पास नंतर सहाय्यकारी प्रसाविकाचा शासनमान्य संस्थेतील १८ महिन्याचा कोर्स आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिषदेमध्ये नोंदणी आवश्यक |
| | | | | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | |
| | | | | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | |
| | | | | सर्वसाधारण | ०२ | ०२ | ०२ | -- | ०१ | -- | -- | ०३ | ०६ | ०१ (अल्प दृष्टी) | |
| ०७ | कंत्राटी ग्रामसेवक | २५००/- मानधन अधिक नियमित प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील | ३५ | अंशकालीन | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ (अल्प दृष्टी) | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६०% गुणासह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणाची |
| | | | | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ (भूकंप्र ग्रस्त) | | |
| | | | | मा.सै | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | | |
| | | | | महिला | ०१ | ०२ | -- | -- | ०१ | -- | -- | ०१ | ०५ | | |
| | | | | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | | |
| | | | | सर्वसाधारण | ०२ | ०४ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०१ | ०२ | ०४ | | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | पदवी(बी.एस.डब्ल्यु) |
| ०८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (लघुसिंचन) | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | ०३ | महिला | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा व आर्कीअेक्चरल ड्राफसमन (वास्तू शास्त्र आरेखक) कन्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) आरेखक (स्थापत्य) दोन वर्षाचा पाठयक्रम तसेच स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/ पदविधारक |
| | | | | सर्वसाधारण | -- | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | | |
| ०९ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम) | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | ०७ | मा.से | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा व आर्कीअेक्चरल ड्राफसमन (वास्तू शास्त्र आरेखक) कन्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) आरेखक (स्थापत्य) दोन वर्षाचा पाठयक्रम तसेच स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदविका/ पदविधारक |
| | | | | महिला | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | | |
| | | | | सर्वसाधारण | -- | ०२ | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | | |
| १० | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ०२ | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | संविधान मान्य विद्यापिठाची पदवी धारक |
| ११ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | ०१ | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांनी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परिक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परिक्षा विभाग, शिक्षण संचनालय,महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द प्रति मिनिट या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करित असतील किंवा टंकलेखुंनामध्ये ५०% गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | ०१ | सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १० वी पास व टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ३० शब्द प्रति मिनिट उत्तीर्ण |

## जाहिरातीसाठी एकत्रित सूचना

**वयोमार्यादाः-**

**०१.**उमेदवाराचे वय दि.१७/०९/२०११ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे तर मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**०२.**वर्ग-३ पदासाठी राखीव जागांवर नेमणूक करण्यासाठी माजी सैनिकांची सहा महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्रशासनाच्या सशस्त्र दलात व्हावयास हवी. अशा सैनिकांचे बाबतीत त्यांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी जिल्हा परिषदेतील पदावर नेमनुकीसाठी विहीत वयोमर्यादेत सुट देण्यात येईल. विकलांक माजी सैनिकांच्या बाबतीत वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत सुट देण्यात येईल. ही सवलत बिनराखीव पदांबाबतही राहील.

**०३.** अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

**०४.** शासनाच्या दिनांक २६ मे, २००५ च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत ०३ वर्ष अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चत्तम वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

**विशेष सुचना**

**०१.**सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशासन २०००/प्र.क्र.०५/२००१/३२ दिनांक २०/०७/२००२ व अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणा-या

उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

- D.O.E.A.C.C. सोसायटीच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा
- महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**सर्व पदांसाठी समान सुचना**

**०२.** उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमेसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

**०३.** उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहीत केलेल्या ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो डकवावा व फोटोखाली दर्शविलेल्या ठिकाणी स्वतःची स्वाक्षरी करावी.

**०४.** जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावं नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची स्वाक्षांकीत केलेली प्रत अर्जासोबत जोडावी.

**०५.** अपंगाचे आराक्षण शासन निर्णय क्रमांक अपंग १०९८/प्र.क्र.२०४६/आस्था-९ दिनांक ०६ जानेवारी, २००४ आणि शासन परिपत्रक क्रमांक अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६अ दिनांक ०६ मे, २००४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील तसेच ज्या अपंग उमेदवारांना लेखनिकाची आवश्यकता आहे त्यांनी तसा स्पष्ट उल्लेख अर्जात करावा. त्यांना लेखनिक जिल्हा परिषदेमार्फत पुरविला जाईल तसेच जाहिरातीत नमुद केलेले अपंगांचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर बदल करुन सुयोग्य उमेदवाराची निवड करण्यात येईल अपंग प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवाराकडे अपंगत्वाचे किमान ४०% अपंगत्व असल्याचे सक्षम वैद्यकिय अधिका-याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**०६.** लेखी परिक्षेत गुणानुक्रमे गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**०७. अर्जासोबत पुढील कागदपत्रे (लागू असल्याप्रमाणे) जोडावीत.**
०१)शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे. ०२)वयाचा दाखला / जन्मतारखेचा पुरावा. ०३)अनुभवाचा दाखला / पुरावा. ०४) जातीचा दाखला व जातवैधता पडताळणी प्रमाणपत्र. ०५) नॉनक्रीमिलेअर दाखला. ०६) माजी सैनिक असल्याचा पुरावा. ०७) अपंगत्वाचा दाखला. ०८) गुणवत्ताधारक खेळाडू असल्याचा दाखला. (राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावरील खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्य पद स्पर्धेत प्रथम , द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.) ०९) संगणक परिक्षा (MS-CIT) उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र. १०) रहिवासी प्रमाणपत्र. ११) अंशकालीन असल्याचा दाखला. १२) लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र. **(अर्जदाराने सदर प्रमाणपत्रांच्या सक्षम प्राधिका-यांनी स्वाक्षांकित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक राहील.तसे नसल्यास किंवा चुकिची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.)**

**०८.** अनुभवाच्या बाबतीत तासिका तत्वावर शिकाऊ उमेदवार अर्धवेळ, विनावेतन, अतिरिक्त कार्यभार, प्रभारी पदावरील अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

**०९.** शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

**१०.** शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ०५ जून,२००६ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी तसेच महिलांकरिता राखीव पदासाठी अर्ज करणा-या महिला उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-२०११ चे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकाराक राहिल.

**११.** महिलांचे आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक ८२/२००१ मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार राहील.

**१२.** शासन परिपत्रक क्रमांक पीआरई-२००४/३८५५/प्रा.शि.-१ दिनांक ०२ जून,२००५ माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्दकाळात व युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत्यु झालेल्या किंवा कामय अपंगत्व येऊन सैनिकी सेवेसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला शासन परिपत्रकात नमुद कुटुंबातील सभासदास नियुक्ती देण्याबाबत तरतुद आहे. माजी

सैनिकांसाठी सैन्यात सहा महीन्यापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्रशासनाच्या सशस्त्र दलात झालेली असेल अशा सैनिकाच्या बाबतीत त्याच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेचा कालावधी अधिक तीन वर्षे इतकी वयोमर्यादेत सुट देण्यात येईल.

१३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअक-१००५/प्र.क्र.३६/०५/१६अ दिनांक २६ ऑगस्ट, २००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१४. राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावरील खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्य पद स्पर्धेत प्रथम , द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू यांचेसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३० एप्रिल, २००५ मधील तरतुदीनुसार राहील. सदर गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा पाच वर्षावर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील सदर गुणत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. उक्त प्रमाणपत्र हे संचालक क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून पडताळणी झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

१५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक २७ ऑक्टोंबर, २००९ च्या तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना आरक्षण लागू राहील.

१६. अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे पुरावे सोबत जोडणे आवश्यक राहील.

१७. कोणत्याही अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

१८. मौखिक परिक्षेसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची यादी ही पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या व किमान गुण धारण करणा-या त्या-त्या संवर्ग /प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये ते धारण करित असलेली शैक्षणिक अर्हता, जाहिरातीतील नमुद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेऊन मर्यादित केली जाईल.

१९. रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणात पदे कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे वा रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,धुळे स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणताही दावा सांगता येणार नाही.

२०. जाहिरातीत नमुद केलेली काही संवर्गाची पदे ही एप्रिल - २०१२ अखेर पर्यंत रिक्त होणारी असून निवड केलेल्या उमेदवारांना जसजशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियुक्त्या देण्यात येतील.

२१. उमेदवार ज्या राखीव जातीच्या प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र वा जातवैधता पडताळणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार नाही. राखीव पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एक महिन्याच्या आत जात वैधतेसाठीचा प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.

२२. जिल्हा परिषदेकडे ज्या स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य वा सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचारी पाल्य यांनी रास्त अर्ज केलेला आहे त्यांनी जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज करणे बंधकारक आहे. त्यांच्या रास्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२३. सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त होणा-या जनगणना/अंशकालीन कर्मचारी/माजी सैनिक कल्याण बोर्ड यांच्याकडून शिफारस होणा-या उमेदवारांनी विहित करण्यात आलेले परिक्षा शुल्क भरून अर्ज करणे बंधनकारक राहील.अर्ज न करणा-या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

२४. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी ठेवण्यात आलेल्या गुणांकरिता तपासावयाच्या मुळ कागदपत्रात अर्हतेच्या मुळ कागदपत्राशिवाय आवश्यक असेल तसे प्रकरणनिहाय पुढील (प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र, विवाहीत/घटस्फोटीत

उमेदवारांकरिता लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र, शारीरिक दृष्ट्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र, खेळविषयक प्रमाणपत्र, अंशकालीन काम केल्याचे प्रमाणपत्र, संगणक अर्हता प्रमाणपत्र इ.) तपासणी समितीकडून तपासली जातील.

**२५.** पात्र उमेदवारांचे परिक्षेचे प्रवेशपत्र जिल्हा परिषद, धुळेच्या स्वागत कक्षात परिक्षेच्या दोन दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत वितरीत करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**२६.** परिक्षेला येतांना सर्व मूळ कागदपत्रे व साक्षांकित प्रतींचा संच सोबत आणावा.शक्यतो लेखी परिक्षेनंतर लगेच उत्तरपत्रिका तपासण्यात येऊन लगेच मुलाखती घेण्यात येतील.यासाठी वेगळे मुलाखतपत्र पाठविण्यात येणार नाहीत.त्याच रोजी मुलाखत घेणे शक्य न झाल्यास तेथेच मुलाखतीचा दिनांक जाहीर करण्यात येईल.

**२७.** महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१ ऑक्टोबर २००५ नंतर नियुक्त होतील त्या कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

**२८.** लेखी परिक्षेकरिता अर्ज स्विकृतीचा कालावधी दिनांक-१९/०९/२०११ ते दि.३०/०९/२०११ असा राहील.उमेदवारांनी त्यांचे अर्ज जिल्हा परिषद, धुळे येथे कार्यालयीन कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सादर करावेत.व दिनांकित पोहोच स्वतः प्राप्त करून घ्यावी, परिक्षेचे स्थळ हे प्रवेशपत्रामध्ये नमूद करण्यात येईल.

**२९.** सदर जाहिरात व पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या जिल्हा परिषद, धुळे च्या कार्यालयात उपलब्ध करण्यात येतील.

**३०.** जाहिरात प्रसिध्द् होण्यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**३१.** प्रत्येक पदासाठ स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील.

**३२.** नैसर्गिक आपत्ती वा इतर कारणांमुळे विहित दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

**३३.** खालील नमुद केल्या नुसार परिक्षा शुल्क "*मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,धुळे*" यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राप्ट अर्जासमवेत जोडणे आवश्यक. सदर परिक्षा शुल्क ना परतावा असुन कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. वरिष्ठ सहाय्यक (लिपिक),कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)/(लेखा) पदासाठी उमेदवारांची निवड करतांना मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्यांत येतील व लेखी परीक्षे मध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतीम निवड यादी तयार करण्यात येईल. अर्जासोबत उमेदवाराकडून खालील प्रमाणे परीक्षा शुल्क खालील प्रमाणे-

| अ.नं. | तपशील | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ०१ | लेखी परीक्षा व मुलाखत (इतर सर्व पदांसाठी) | २०० | १०० |
| ०२ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक),कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)/(लेखा) या पदासाठी | १५० | ७५ |
| ०२ | माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. | -- | -- |

**३४.** पदासाठी असणारी किमान अर्हता व पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेत पात्र ठरणा-या उमेदवारांनाच मुलाखतीस बोलविणेत येईल.

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र**
**नमुना अ ( नियम ४ पहा )**

मी, श्री/ श्रीमती / कुमारी ------------------------------------------------

श्री. ------------------------------------------------------------ यांचा / यांची मुलगा / मुलगी/पत्नी वय --------------------- वर्षे राहणांर ------------------------------------------ या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.आज रोजी मला ------- ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा .) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- ( उमेदवाराची सही )

| |
|---|
| समक्ष ( सक्षम प्राधिकारी ची सही) |

**३५.** सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १९ मार्च २००८ च्या शासन परिपत्रकानुसार प्रश्न पत्रिकेचे स्वरुप व दर्जा खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | संवर्ग | प्रश्न पत्रिकेचा दर्जा | लेखी परीक्षेचे गुण | मौखिक परीक्षेचे गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कनिष्ठ अभियंता (ल.सिं.वि)/(बांधकाम) | सर्व विषय एस.एस.सी.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परिक्षा. | १८० | २० | २०० |
| ०२ | औषध निर्माता | सर्व एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र विषयक प्रश्न | १८० | २० | २०० |
| ०३ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | मराठी १२ वी दर्जा लेखा विषयक प्रश्न इतर पदवी दर्जाची परिक्षा | १८० | २० | २०० |
| ०३ | आरोग्य सेवक (पुरूष) (हंगामी फवारणी कर्मचा-यांमधून) | सर्व एस.एस.सी.दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न | १८० | २० | २०० |
| ०४ | आरोग्य सेवक (स्त्री) | एस.एस.सी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न | १८० | २० | २०० |
| ०५ | कंत्राटी ग्रामसेवक | सर्व विषय एच.एस.सी.दर्जाचे प्रश्न | १८० | २० | २०० |
| ०६ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (लघुसिंचन)/(बांधकाम) | एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न | १८० | २० | २०० |
| ०७ | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परिक्षा | २०० | -- | २०० |
| ०८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)/(लेखा) | सर्व विषय एस.एस.सी.दर्जाची परिक्षा | २०० | -- | २०० |

**परिक्षेचे वेळापत्रक**

| अ.क्र | दिनांक | वेळ | पदाचे नाव | वेळ | पदाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०९/१०/२०११ | स. १०:०० ते ११.३० | कनिष्ठ अभियंता (लघुसिंचन)/(बांधकाम) | --- | --- |
| २ | १६/१०/२०११ | स. १०:०० ते ११.३० | औषध निर्माता, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | दु.२:०० ते ३.३० | आरेग्य सेवक (पुरूष),आरोग्य सेवक (महिला) |
| ३ | २३/१०/२०११ | स.१०:०० ते ११:३० | कंत्राटी ग्रामसेवक, | दु.२:०० ते ३.३० | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक(लघुसिंचन)/(बांधकाम) |
| ४ | ०६/११/२०११ | स.१०:०० ते ११.३० | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक), | दु.२:०० ते ३.३० | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)/ (लेखा) |

**३६.** निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात वा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याची किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल.

**सदस्य**
**जिल्हा निवड समिती (गट-क) तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,धुळे.**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती (गट - क) तथा**
**जिल्हाधिकारी**
**धुळे.**

## जिल्हा परिषद, धुळे विशेष अनुशेष भरती मोहिम सन २०११
## अर्जाचा नमुना

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक-

| | |
|---|---|
| | |

येथे फोटो चिटकवावा

**प्रति,**
म.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,धुळे.

**विषय :-** ---------------------------------------------------- पदासाठी अर्ज.

१) संपूर्ण नांव :- ----------------------------------------------------------------
आडनांव ----------------------------------------------------------------------
वडिलांचे / पतीचे नांव -------------------------------------------------------
२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पीनकोडसह) घर क्र.वॉर्ड क्र.----------------------------------
इत्यादी-------------------------शहर / गांव ---------------------------------
पोष्ट-----------------------------------
तालुका -------------------------------- जिल्हा -------------
पीनकोड-------------------------------- मोबाईल नंबर----------------------
३) अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे, खालील लागू असलेल्या प्रवर्गाचा क्रमांक चौकोनात लिहावा.

| अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

४) अर्जदाराने कोणत्या जातीच्या प्रवर्गासाठी अर्ज केला आहे, खालील लागू असलेल्या प्रवर्गाचा क्रमांक चौकोनात लिहावा

| अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

५) अ) मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा ------------------
ब) अ.जा./अ.ज.वगळून मागासवर्गीय असल्यास आपण उन्नत व प्रगत गटात आहात काय ? होय / नाही.
६) अर्जदार स्त्री आहे की पुरुष स्त्री / पुरुष
७) अर्जदार : १) माजी सैनिक
२) स्वातंत्र्य सैनिकाचा नामनिर्देशन पाल्य
३) अस्थिव्यंग/मुकबधिर/कर्णबधिर/अंध अल्पदृष्टी/अपंग
४) प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त
५) राष्ट्रीय खेळाडू
क्रमांक चौकटीत लिहावा. ( )
८) अर्जदाराची जन्मतारीख : अंकामध्ये (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

९) दिनांक /०९/२०११ रोजीचे वय.
(जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

१०) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशील)

| शैक्षणिक व व्यावसायिक पत्ता | परीक्षा मंडळाचे / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकुण मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) राष्ट्रीय : भारतीय / अभारतीय.
१२) महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय ? होय / नाही.
१३) अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाकडे नांव व नोंदणी केली आहे काय ? होय / नाही.
१४) डिमांड ड्राप्टचा तपशील रु.-------------- बँकेचे नांव ------------ क्रमांक--------
१५) अनुभव असल्यास सविस्तर तपशील खालील तक्त्यांत नमूद करावा. (प्रमाणपत्र सोबत जोडावे)

| काम केलेल्या संस्थेचा / कार्यालयाचा तपशील | कालावधी | पद व अनुभवाबाबत सविस्तर तपशील |
|---|---|---|
| | | |

**अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (असलेल्या प्रमाणपत्रावर खुण करावी)**

०१) जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिका-याचे.
०२) शैक्षणिक पात्रतेच्या मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती गुणपत्रिकेसह.
०३) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/माजी सैनिक व अपंग उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांचा दाखला (स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्याच्या बाबतीत स्वातंत्र्य सैनिकाचे सन्मानपत्र व मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात नोंदविलेले पत्र.)
०४) राष्ट्रीय खेळाडूसाठी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र.
०५) जन्म दिनांकासाठी एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण असलेबाबत प्रमाणपत्राची प्रत.
०६) उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-२०११ या वर्षाचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र.
०७) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २८/०३/२००५ नुसार अर्जदारास कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र विहित नमुन्यात सादर करावे.
०८) अनुभव प्रमाणपत्र.

वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरी आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्यापाशी आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो की, / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमवण्यास व अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहील व त्याबद्दलची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी
दिनांक :- नांव :-

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र**
**नमुना अ ( नियम ४ पहा )**

मी, श्री/ श्रीमती / कुमारी -------------------------------------------------
श्री. ------------------------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी/पत्नी वय ----------------------
वर्षे राहणांर ------------------------------------------- या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,
मी ----------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.आज रोजी मला ------- ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा .) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होंईल याची मला जाणीव आहे.
ठिकाण :-
दिनांक :- ( उमेदवाराची सही )

समक्ष ( सक्षम प्राधिकारी ची सही)

**ठिकाण :-** **सही**
**दिनांक :-**